F/c


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिकामार्ग, पत्रपेटीक्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी- २२६१७९६९ , फॅक्स- २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


ईमेलद्वारे

क्रमांक :१८/तशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/ ३७१

दिनांक : ५/०८/२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय: **शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता महाडीबीटी पोर्टलवरील योजना राबविण्याबाबतचे वेळापत्रक..**

**संदर्भ** :- महाडीबीटी पोर्टलवरील पोस्ट मॅट्रीक योजनांचे सन २०१९-२० साठीचे दि.२६/०७/२०१९ रोजी ईमेलद्वारे प्राप्त वेळापत्रक.

सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, **महाडीबीटी पोर्टल** (संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) बनविण्यात आलेले असून त्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना उपरोक्त योजनांच्या **सन २०१९-२०** च्या अंमलबजावणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या व सोबत जोडलेल्या संदर्भीय पत्राद्वारे दिलेल्या वेळापत्रकानुसार खालीलप्रमाणे आवश्यक ती संबंधित कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे.

१) महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी झालेल्या सर्व संस्थांनी त्यांना प्राप्त झालेल्या पोर्टलबाबतच्या लॉगीन क्रिडेन्शिअल्सचा वापर करुन संस्थेची अचूक माहिती ( जसे संस्थेचे प्रोफाईल, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांना लागू असलेले सर्व शुल्क व परीक्षा शुल्क इ. ) ऑनलाईनरित्या अद्ययावत करुन संबंधित विभागाकडे मंजूरीसाठी वेळापत्रकात दिलेल्या अंतिम तारखेपूर्वी मंजूरीसाठी ऑनलाईनरित्या पाठवून मंजूर करुन घ्यावे.

२) सर्व संस्थांनी दर्शनी भागावर नोटीस लावून संस्थांमध्ये शिकणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना **डी.बी.टी पोर्टल** (संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर **सन २०१९-२० साठी** अर्ज अंतिम दिनांकापर्यंत न थांबता लवकरांत लवकर भरण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच, पोर्टलवर योजनेकरीता अर्ज भरण्याबाबत विद्यार्थ्यासाठी एक स्वतंत्र संगणक कक्ष उपलब्ध करुन देण्यात यावा व संस्थांनी योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी संबंधित लागू असलेल्या योजनेसाठी अर्ज करण्यापासून वंचित राहाणार नाही याबाबत संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: दक्षता घ्यावी.

३) संस्थांनी त्यांना प्राप्त झालेल्या **डी.बी.टी पोर्टल** च्या लॉगीन क्रेडेन्शिअल्सचा (क्लार्क व प्राचार्य ) वापर करुन संबंधित योजनेच्या प्राप्त झालेले अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तीनुसार तपासून, पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने संबंधित कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठवावे. तसेच, विद्यार्थ्यांना केलेल्या अर्जामध्ये काही त्रुटीच्या दुरुस्ती असल्यास संस्थेकडून विद्यार्थ्यांकडे ऑनलाईनरित्या परत पाठविण्यात आलेले अर्ज विद्यार्थ्यांकडून अंतिम दिनांकापर्यंत न थांबता पुन्हा योग्य त्या दुरुस्तीसह मागविण्यात यावेत.

तसेच, संबंधित विभागीय कार्यालयाने देखील

विभागीय कार्यालयाकडे मंजूरीसाठी प्राप्त झालेल्या संस्थांचे ऑनलाईन प्रस्ताव प्रलंबित न ठेवता तपासणी करुन मंजूर करावे अथवा संस्थांचे ऑनलाईन प्रस्ताव चूकीचे असल्यास संस्थेला कळवून ऑनलाईनरित्या परत पाठवावे व संबंधित संस्थांना अचूक प्रस्ताव परत ऑनलाईनरित्या जमा करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच,संस्थांकडून विद्यार्थ्यांचे तपासणी करुन पाठविण्यात आलेले अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज प्रलंबित न ठेवता प्राप्त झालेले अर्ज संबंधित योजनेच्यां शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तीनुसार तपासून, पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने सोबतच्या वेळापत्रकात दिलेल्या अंतिम तारखेपूर्वी मंजूरीसाठी पाठवावे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर. (लक्षवेध : श्री. संजय धारुरकर, अवर सचिव)

२) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय विस्तार भवन, सातवा मजला, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.( लक्षवेध : श्री. रा.म. गेंगजे, अवर सचिव )

३) मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय विस्तार भवन, पाचवा मजला, मुंबई -३२. यांना माहितीसाठी सविनय सादर.

---

पृष्ठांकन पत्र क्र. विकाऔ/शिक्षण/२०१९/ २५१४
दिनांक : - 7 AUG 2019

प्रति,
प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/शासन अनुदानित/विना अनुदानित
पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था
औरंगाबाद विभाग

उपरोक्त संचालनालयाचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या अमंलबजावणीसाठी महाडीबीटी पोर्टलवर जाहिर केलेल्या व सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. आपल्या संस्थेतील कोणताही पात्र विद्यार्थी सवलतीपासुन वंचित रहाणार नाही याची दक्षता घ्यावी.

सोबत : वेळापत्रक.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांकरीता.

## Schedule Plan for MahaDBT Portal of Post Matric Scheme for Academic Year 2019-20

| Sr. No. | Module | Start Date | End Date |
|---|---|---|---|
| 1 | Institute Profile Update and Approval by FRA/ SSS/ Dept. | 19th June 2019 | 5th August 2019 |
| 2 | Application Acceptance AY 19-20 for Merit Schemes | 1st August 2019 | 31st August 2019 |
| 3 | Application Acceptance other than Merit Schemes AY 19-20 | 1st August 2019 | 10th October 2019 |
| 4 | Institute Scrutiny for Merit Schemes | 1st August 2019 | 16th September 2019 |
| 5 | Department Scrutiny for Merit Schemes | 1st August 2019 | 23rd September 2019 |
| 6 | Institute Scrutiny for Other schemes - 1st Installment | 1st August 2019 | 23rd October 2019 |
| 7 | Department Scrutiny for Other Schemes - 1st Instalment | 1st August 2019 | 31st October 2019 |
| 8 | Start of Non Merit Scheme Allotments | 16th August 2019 | |
| 9 | Allotment of Merit Schemes | 25th September 2019 | |
| 10 | Institute Scrutiny 2nd Installment | 16th November 2019 | 25th January 2020 |
| 11 | Bill generation for DDOs | 16th August 2019 | 31st January 2020 |